# <u>महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ</u>

**<u>परिपत्रक</u>**

दूरध्वनी क्र : ०२२-२४३०६७१७/४३२२६८२५

फॅक्स क्र.: ०२२-४२२१००१९

ई-मेल : pro.mlwb-mh@gov.in

मका/ग्रंथालय/१६-१७/२०

हु.बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,

एलफिन्स्टन (प), मुंबई - ४०० ०१३

दिनांक – २३ जून २०१६

**विषय :- परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती योजना.**

पदव्युत्तर पदवीच्या शिक्षणासाठी तसेच पीएच.डी.साठी परदेशात गेलेल्या कामगार पाल्यांना सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती दिली जाते. पात्र विद्यार्थीस रु.५० हजार शिष्यवृत्ती एकदाच मंजूर केली जाईल. **सदर शिष्यवृत्तीसाठी दोन वर्षांचा शैक्षणिक खंड ग्राह्य धरण्यात येत येईल.**

विभागीय कार्यालयांनी आपल्या स्तरावर अर्थसंकल्पिय तरतुदीच्या अधिन राहून लाभार्थी संख्या निश्चित करावी. लाभार्थीची गुणवत्ता यादी तयार करताना पुढील कालमर्यादेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशिल | अंतिम मुदत |
|---|---|---|
| १. | केंद्रांत अर्ज स्वीकारणे. | ऑक्टोबर अखेरपर्यंत |
| २. | केंद्रांनी गट कार्यालयाकडे अर्ज पाठवणे. | नोव्हेंबरचा दुसरा आठवडा |
| ३. | गट कार्यालयाने विभागीय कार्यालयाकडे अर्ज पाठवणे. | नोव्हेंबर अखेरपर्यंत |
| ४. | विभागीय कार्यालयांनी मंजुरीपत्र निर्गमित करणे. | डिसेंबर अखेरपर्यंत |

**<u>नियम व अटी</u> :-**

१. शिष्यवृत्ती अर्ज विनामूल्य आहे. मात्र, अर्जदार विद्यार्थीने त्याच्या घराजवळील केंद्राचे सभासद होणे बंधनकारक आहे. सभासदत्व स्वीकारलेल्या केंद्रामधूनच शिष्यवृत्ती अर्ज सादर करावा.

२. अर्जदार मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कक्षेत येणारा कामगार कुटुंबीय असला पाहिजे.

३. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर परदेशात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश मिळेपर्यंत २ वर्षाचा शैक्षणिक खंड (गॅप) पडला तरी अर्जदार सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र राहील.

४. परदेशात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या / पीएच.डी. करणाऱ्या कामगार पाल्यांना या योजनेचा लाभ एकदाच दिला जाईल.

५. विद्यार्थ्यांस मागील वर्षी वार्षिक परीक्षेत किमान ६०% गुण असावेत. प्राप्त अर्जांत विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार (मेरीट) व मंडळाने निश्चित केलेल्या आर्थिक तरतुदीच्या अधिन राहून शिष्यवृत्ती मंजूर केली जाईल. सर्वांना सरसकट शिष्यवृत्ती मिळणार नाही.

६. अर्जदार परदेशात कोणत्या शाखेचे उच्च शिक्षण घेणार आहे. त्याबाबत संबंधित विद्यापीठ/महाविद्यालय यांच्या दाखल्याची (बोनाफाईड सर्टीफिकेट) झेरॉक्स जोडावी.

७. जूनमध्ये कामगार कल्याण निधी कपात झाल्याची नोंद असलेली पेमेंट स्लीप व आस्थापनेचा दाखला असे दोन्ही कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. जूनमध्ये साखर कारखाने बंद असल्याने कामगारांचा जूनमध्ये पगार होत नाही. अशावेळी जूनऐवजी डिसेंबरची वेतनपावती (पे स्लीप) ग्राह्य मानावी व ती अर्जासोबत जोडावी. डिसेंबरच्या वेतन पावतीत कामगार कल्याण निधी कपात झाल्याची नोंद असावी.

९. कंपनी बंद पडली असल्यास आस्थापनेचा कंपनी बंद पडल्याचा दाखला जोडावा. सदर दाखला तीन वर्षांपर्यंत वैध राहील.

१०. शिष्यवृत्ती रक्कम लाभार्थीच्या बँक खात्यात ऑनलाईन जमा होणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचे स्वतःचे (किंवा पालकासह संयुक्त) खाते बँकेत असणे बंधनकारक आहे. **सदर बँक खाते विद्यार्थ्याने त्याच्या आधार क्रमांकाशी लिंक करुन घ्यावे.**

११. विद्यार्थ्याने शक्यतो बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये खाते उघडावे. तसे शक्य नसल्यास आय.एफ.एस.सी क्रमांक व मायकर क्रमांक असलेल्या राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका व शेड्युल्ड को-ऑप बँकामध्ये खाते उघडावे. मात्र, आय.एफ.एस.सी क्रमांक व मायकर क्रमांक नसलेल्या बँकेत अर्जदाराचे खाते असल्यास अथवा अर्जदाराचे बँक खाते बंद स्थितीत असल्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही व याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१२. पडताळणी करण्यासाठी लाभार्थी विद्यार्थीचे नाव, बँक खाते क्रमांक, बँकेचा मायकर क्रमांक व आय.एफ.एस.सी.क्रमांक यांची नोंद असलेला बँकेचा कॅन्सल चेक (रद्द चेक) किंवा पासबुकची साक्षांकित प्रत (झेरॉक्स) अर्जासोबत जोडावी.

१३. मुक्त विद्यापीठाचे बहिःस्थ शिक्षण / दूरस्थ शिक्षण घेणारे विद्यार्थी, तसेच अप्रेंटिसशीप, इंटर्नशीप किंवा शिक्षण घेताना मानधन, मेहनताना, मोबदला घेणाऱ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.

१४. अपंग विद्यार्थींना शासनाच्या धोरणानुसार एकूण शिष्यवृत्ती रकमेच्या तीन टक्के प्रमाणात सरसकट शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल. त्यासाठी टक्केवारी व पालकाच्या उत्पन्न मर्यादेचे कोणतेही बंधन असणार नाही.

१५. विद्यार्थ्याने अर्ज जमा करताना सर्व कागदपत्रे स्वयं-साक्षांकित / साक्षांकित करुन अर्जासोबत जोडल्याची व बँक तपशिल बरोबर भरल्याची खात्री करावी. अर्ज स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्याकडून पोचपावती अवश्य घ्यावी.

१६.**शिष्यवृत्तीस पात्र न ठरलेल्या अर्जदारांची स्वतंत्र यादी प्रसिद्ध करण्यात यावी. त्यात प्रत्येक अर्जाचे शिष्यवृत्ती न मिळाल्याबाबतचे कारण स्पष्टपणे नमूद करावे.**

१७.विभागीय कार्यालयांनी मंजुरीपत्रकाची प्रत माहितीस्तव मध्यवर्ती कार्यालयास माहितीस्तव सादर करावी.

पुढील आदेश निघेपर्यंत सदर परिपत्रक लागू राहील.

**सोबत : अर्जाचा नमूना व**
**स्वयं-साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र.**

**कल्याण आयुक्त**

**प्रत :-**

१. सर्व अधिकारी, म.का., मुंबई/का.क्री.भवन, मुंबई
२. सहाय्यक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
३. सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये, मुंबई
४. कामगार विकास अधिकारी, पुणे, नागपूर
५. कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये
६. सर्व केंद्र प्रमुख

**सूचना** – गट कार्यालयांनी आपल्या अंतर्गत येणाऱ्या केंद्रांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.